# कर्मवीर भाऊराव पाटील जयंती उत्सव २०२४-२५

# भूगोल विभाग अहवाल

## १. वर्गाचे नाव: भूगोल विभाग

## २. वर्गातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४९

## ३. उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या ३८


## ६. भाषण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, भाषणांचे विषय व यादी

## ३. (विद्यार्थी तयारी वक्तृत्व)

## कर्मवीरांच्या बद्दल मनोगत व्यक्त करणारे विद्यार्थी -

| अ.क्र . | विद्यार्थ्यांची नावे | विषय |
|---|---|---|
| 1 | प्रियांका वाघमारे | बहुजनांच्या शिक्षणाचे शिल्पकार कर्मवीर भाऊराव पाटील |
| 2 | दिग्विजय खोत | कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य |
| 3 | समीक्षा जोशी | महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील |
| 4 | सर्वेश चटणे | कर्मवीर भाऊराव पाटील व्यक्तित्व आणि कर्तृत्व |
| 5 | सुजाता नेर्लेकर | रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेमागील कर्मवीरांची भूमिका |
| 6 | निवृत्ती माळवदे | कर्मवीर घोषवाक्ये |
| 7 | स्नेहल माळी | आजच्या शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने |
| 8 | ओंमकार पाटील | कर्मवीर आण्णा |
| 9 | दिया माने | रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील |
| 10 | यश शहा | शिक्षण महर्षी कर्मवीर - |
| 11 | अंजली ऐनापुरे | कर्मवीरायण |
| 12 | ओंकार माळी | कमवा आणि शिका योजना |
| 13 | प्रणाली रोडे पाटील | कर्मवीर भाऊराव पाटील |
| 15 | जयश्री तेली | कर्मवीर भाऊराव पाटील व्यक्तित्व आणि कर्तृत्व |
| 15 | वृषाली पाटील | रयत माऊली लक्ष्मीबाई कर्मवीर भाऊराव पाटील |
| 16 | प्राची रायते | कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील कविता |

# कर्मवीर चित्रमय जीवनपट



# विभागीय ग्रंथालय

# कॉलेजच्या ग्रंथालय विभागास पुस्तके भेट





कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त भूगोल विभागामार्फत कॉलेजच्या ग्रंथालय विभागात अंधश्रद्धा निर्मूलनाच्या उद्देशाने नरेंद्र दाभोलकर लिखित १५ पुस्तकांचे २ संच एकूण किमत ९०० रुपये ग्रंथालयास भेट दिले. सदर भेटीमागील उद्देशविद्यार्थ्यांच्या मनातील अंधश्रद्धेचे निर्मूलन होईल तसेच अंधश्रद्धेस बळी पडणाऱ्या लोकांची त्यातून मुक्तता व्हावी हा आहे.

# ४. उल्लेखनीय कामांचा विस्तृत अहवाल

## १.पोस्टर सादरीकरण

रविवार दिनांक  २२ सप्टेंबर  २०२४ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त भूगोल विभाग यांच्यातर्फे पोस्टर प्रदर्शन आयोजित केले. पोस्टरच्या सहाय्याने विद्यार्थी जे ज्ञानग्रहण करतात त्या ज्ञानाचे दृढीकरण चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले सदर उपक्रम मध्ये पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून चांगल्या प्रकारे पोस्टर्स तयार केली




१नैसर्गिक आपत्ती- कुमारी वैष्णवी रमेश शिंदे

२ पर्यटन क्षेत्रातील रोजगार संधी- धनिष्ठा किरण कल्याणी

३ पृथ्वीचे संरक्षण आणि संवर्धन- सुजाता नेर्लेकर

४पृथ्वी वाचवा- दिग्विजय खोत

५झाडे वाचवा- सर्वेश सोमनाथ

६ग्रहणे आणि अंधश्रद्धा-दिया विजयकुमार माने

७नैसर्गिक आपत्ती-प्रियांका वाघमारे

८पर्यटन क्षेत्रातील रोजगार संधी-धनिष्ठा किरण कल्याणी

९मी पृथ्वीला मदत करू शकते- -प्रियांका वाघमारे

# २.विविध कडधान्यांचे नमुने




सदर उपक्रमामध्ये आपल्या आहारामध्ये प्रथिनांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे शरीराची वाढ विकास व बांधणी होण्यासाठी प्रथिने आवश्यक असतात अशी प्रथिने मानवास मांसाहारातून मोठ्या प्रमाणामध्ये मिळतात पण बहुतांशी वर्ग शाकाहारी असल्याने त्यांना त्यांची प्रथिनांची गरज पूर्ण करण्यासाठी विविध कडधान्यांचा वापर मोठ्या प्रमाणामध्ये करता येऊ शकतो त्या संदर्भात विद्यार्थ्यांच्या मध्ये जाणीव जागृती व्हावी त्याची माहिती मिळावी यासाठी सदर प्रकल्प राबविनेत आला.

1 रोहित विकास माळी

2 सिद्धार्थ शिवाजी शिंदे

या दोन विद्यार्थ्यांनी सदर प्रकल्प तयार केला या प्रकल्पाचा उद्देश

1 मानवी आहारामध्ये कडधान्यांचे महत्त्व सांगणे

2 कडधान्य उच्च प्रकारची प्रथिने फायबर सामग्रीद्वारे समृद्ध असतात हे समजावून सांगणे

3 कडधान्यांमध्ये साधारणता वीस ते पंचवीस टक्के प्रथिने असतात

4 कडधान्यांच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढते

5 कडधान्य क जीवनसत्व मॅग्नेशियम पोटॅशियम  यांनी समृद्ध असतात.

# ३. वाकुर्डे उपसा सिंचन योजना-

प्रामुख्याने सध्या मोठ्या प्रमाणात कोरडवाहू जमीन बागायती करण्यासाठी उपसा सिंचनाची मदत घेतली जाते. अशी सिंचन योजना विहीर, तळे, सरोवर, नदी अशा परिसरामध्ये सहज राबवता येते; पण खंडांतर्गत भागामध्ये असणारे कोरडवाहू क्षेत्र ओलीताखाली आणण्यासाठी उपसा सिंचन योजनांची मोठ्या प्रमाणात कार्यवाही करावी लागते. त्या अनुषंगाने **वाकुर्डे उपसा सिंचन योजना** ही चांदोली धरणातील पाणी इस्लामपूरच्या पश्चिमेस व दक्षिनेस असणाऱ्या ओझर्डे, जक्राईवाडी, जबळेवाडी, कपारी, लाडेगाव, मांगले इ. तसेच ठानापुडे, डोंगरवाडी, चिकुर्डे, करंजवडे, शेखरवाडी, कारावे, ढगेवाडी, वशी, कुरळप, येलूर इटकरे परिसरामध्ये आणण्यासाठी वाकुर्डे उपसा सिंचन योजना राबविण्यात आली. याची माहिति घेण्यासाठी ( **M.A./M.Sc. I)** मधील **कु. श्रावणी दिलीप कदम** हिने सहभाग घेतला आहे. तिने या संदर्भात वर्तमानपत्रांमध्ये आलेले कात्रणे काढून बोर्ड तयार केला आहे. त्या अनुषंगाने तिला उपसा सिंचन योजना म्हणजे काय? बागायती क्षेत्र, कोरडवाहू क्षेत्र, ओलिताखालील क्षेत्र या उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून होणारी पाण्याची उपलब्धता, पिकांची वाढ एकूणच ग्रामीण विकासामध्ये या उसासिंचन योजनेचे योगदान या अनुषंगाने माहिती मिळाली आहे.




**- वर्तमान पत्रातील श्रावणातील वाकुर्डे उपसा सिंचन कात्रणासह विध्यार्थिनी.**

# ४.My Government quiz

**MyGov.in** हे पोर्टल माननीय पंतप्रधानानी २६ जुलै २०१४ रोजी लाँच केले होते या प्लॅटफॉर्मवर नवीन असलेल्या उमेदवारांना सरकारद्वारे आयोजित केलेल्या विविध प्रश्नमंजुषा स्पर्धेबद्दल माहिती मिळते तसेच अनेक

सरकारी संस्था/मंत्रालयांसोबत धोरण तयार करण्यासाठी नागरिकांशी संपर्क साधते आणि सार्वजनिक हित आणि कल्याणाच्या समस्या/विषयांवर लोकांचे मत जाणून घेते. या शासकीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत उमेदवारांना MyGov प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रमाणपत्र , ई प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देखील मिळते. हे तुम्हाला तुमची अभ्यासक्रम क्रियाकलाप मजबूत बनवण्यास मदत करेल तसेच तुमच्या अभ्यासादरम्यान आर्थिक मदत करेल. यास अनुसरून विभागातील एकूण ३५ विद्यार्थी खालील ११ विविध प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी झाले व त्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त झाले.




1.राष्ट्रीय क्रीडा दिन प्रश्नमंजुषा २०२४

2.स्वच्छ भारत अभियान प्रश्नमंजुषा २०२४

3. महापूर जागरूकता प्रश्नमंजुषा

4. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा 2

5. गिर्यारोहणावरील पहिली राष्ट्रीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा

6 निरोगी आहार पूरक आहार प्रश्नमंजुषा

7. ज्येष्ठ नागरिक कल्याण जागृती प्रश्नमंजुषा

8. जागतिक वारसा प्रश्नमंजुषा

9. पर्यावरणपूरक जीवनशैली प्रश्नमंजुषा

10.राष्ट्रीय अवकाश दिवस प्रश्नमंजुषा २०२४

11. उत्तरप्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापारमेळा प्रश्नमंजुषा २०२४

## ५.My Government Pledge

भारत सरकारने एक नवीन मोहीम सुरू केली आहे. ज्याचे नाव माय गव्हर्नमेंट प्लेज आहे , तुम्ही या मोहिमेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन अर्ज करू शकता आणि सरकारकडून ऑनलाइन प्रमाणपत्र देखील मिळवू शकता. तर तुम्ही देखील भारताचे कायमचे रहिवासी असाल तर. त्यामुळे या मोहिमेत सहभागी होऊन या मोहिमेचे मोफत शासकीय प्रमाणपत्र ऑनलाइन मिळवावे , कारण या मोहिमेत सहभागी होऊन देश आणखी चांगला बनवता येईल. आज आम्ही तुम्हाला या लेखाद्वारे सांगणार आहोत की माय गव्हर्नमेंट प्लेज सर्टिफिकेट म्हणजे काय? आणि त्यात सहभागी होण्यासाठी तुम्ही ऑनलाइन नोंदणी कशी करू शकता. त्याची संपूर्ण माहिती ऑनलाईन लिंकसह खाली दिली आहे. ज्याच्या मदतीने तुम्ही सहज माहिती मिळवू शकता आणि अर्ज करू शकता.यास अनुसरून विभागातील एकूण २५ विद्यार्थी खालील १४ विविध प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी झाले व त्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र प्राप्त झाले.




1. अन्नाची नासाडी थांबवण्याची प्रतिज्ञा

2. फिट इंडिया प्रतिज्ञा.

3. वाचण निर्धार प्रतिज्ञा

4. स्वच्छतेची प्रतिज्ञा

5. अहिंसेची प्रतिज्ञा

6. संपूर्ण आरोग्यासाठी प्रतिज्ञा

7. हर घर जल प्रतिज्ञा

8. आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा प्रतिज्ञा

9. पंच प्राण प्रतिज्ञा

10 भारतीय संविधान प्रस्तावना वाचण प्रतिज्ञा

11. अन्नाची नासाडी थांबवण्यासाठी प्रतिज्ञा

12 नशा मुक्त भारत अभियान प्रतिज्ञा

13. अमृत भूमी पर्यावरण संवर्धन प्रतिज्ञा

14. अन्न सुरक्षा इकोसिस्टम मजबूत करण्यासाठी योग्य आहार घ्या प्रतिज्ञा

## ६.पाककला प्रदर्शन

कर्मवीर जयंतीनिमित्त भूगोल विभागात पाककला प्रदर्शन भरविण्यात आले. यामध्ये



१ प्रतिक्षा कदम,    भाकरी दही ठेचा  खोबरे वडी

२.स्नेहल माळी चिकाचे लाडू व वडी

३. प्रेरणा बसुगडे,    बेसन थापी वडी

४.प्रियांका वाघमारे,  सर्व दालीन्पासून बनविलेली भजी

५.श्रावणी कदम    ढोकळा

या विदयार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी भाकरी, दही, ठेचा, खोबऱ्याची वडी, मंचुरियन फ्राय, सर्व डाळीची भजी, ढोकळा  असे विविध पदार्थ बनवून  आणले. त्यांची सजावट करून मांडणी केली.

## १५. रांगोळी प्रदर्शन



कर्मवीर जयंती निमित्त भूगोल विभागामार्फत पर्यावरण व विविध सामाजिक विषयाशी संबंधित रांगोळीचे रेखाटन करण्यात आले.यामध्ये स्वच्छ  ,  भारत,  शेतकऱ्याची आत्महत्या महिला अत्याचार  ,  पृथ्वी वाचवा ,  हवा प्रदूषण,माय गव्हर्मेंट रिलेटेड स्कीम अशा अनेक विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. आज पर्यावरणाचीमोठ्या प्रमाणावर जी हानी होत आहे त्याचा संपूर्ण सजीव सृष्टीवर होणारा परिणाम येथे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

१.प्रतीक्षा कदम,

२.अंजली ऐनापुरे,

३.स्नेहल माळी

४.समृद्धी शेजावळे

५.सानिका पाटील

६.दिया माने




आज महिला सुरक्षित नाही. त्यांच्यावर होणारे अत्याचार रोखण्यासाठी महिलांनी सक्षम असणे गरजेचे आहे. माय गव्हर्मेंट  ॲपद्वारेराबवल्याजाणाऱ्यायोजनांची व स्पर्धांची माहिती विद्यार्थ्यांना विभागात दिली जाते. तेही या रांगोळीतून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा अनेक ज्वलंत सामाजिक विषयांना रांगोळीच्या माध्यमातून स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.

## इतर उल्लेखनीय कामांचा अहवाल

## १. नगर वाचनालय इस्लामपूरनरेंद्र दाभोलकर लिखित पुस्तके भेट



कर्मवीर भाऊराव पाटील जयंती 2024 निमित्त भूगोल विभागामार्फत नरेंद्र दाभोलकर लिखित पुस्तकांचा संच नगर वाचनालय इस्लामपूर यांना दिनांक 20 9 2024 रोजी भेट म्हणून दिला.सदर कार्यक्रमा मागील उद्देश समाजातील सामान्य लोकांच्या मनातील अंधश्रद्धा दूर व्हावे असा आहे म्हणून हा सामाजिक उपक्रमआयोजित केला.

## २. आश्रमशाळेस भेट आणि नरेंद्र दाभोलकर लिखित पुस्तके भेट

कर्मवीर भाऊराव पाटील जयंती 2024 निमित्त अंधश्रद्धा निर्मूलन समिती नरेंद्र दाभोलकर लिखित पुस्तकांचा संच विद्यार्थ्यांना भेट देणे या कार्यक्रमांतर्गत भूगोल विभागामार्फत एस के आश्रम शाळा जाकराईवाडी येथे दिनांक 20//9/2024 रोजी 15 पुस्तकांचा संच ज्याची किंमत 450 रुपये होते भेट म्हणून दिला सदर शाळेत व्ही जे एन टी या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्राधान्य आहे आणि ओबीसी या गटासाठी दहा टक्के जागा राखीव आहे सदर शाळेत आठवी ते बारावी पर्यंतचे वर्ग आहेत एकूण पट 200 आहे.



सदर कार्यक्रमा मागील उद्देश समाजातील सामान्य लोकांच्या मनातील अंधश्रद्धा दूर व्हावे असा आहे म्हणून हा सामाजिक उपक्रमआयोजित केला.

# ३. मतिमंद मुलांच्या शाळेस भेट आणि  शालेय साहित्याचे वाटप



कर्मवीर जयंती निमित्त विद्यार्थी व सर्व शिक्षक स्टाफ मतिमंद मुलांच्या शाळेस भेट देण्यास गेलो होतो त्या शाळेतल्या शिक्षकांशी चर्चा केली व ती त्यांना विचारले विद्यार्थ्यांसाठी खाऊ वाटप केला तर चालेल का तर ते शिक्षक शिक्षकांना बोले की त्या विद्यार्थ्यांना शालेय वस्तू गरजेच्या आहेत त्याच उपलब्ध करून द्याव्यात. त्या शाळेची विद्यार्थी संख्या इतकी आहे त्या विद्यार्थ्यांच्या मनस्थितीचा विचार करून आम्ही त्यांना चित्रकला वही व रंगपेटी अशा दोन वस्तू भेट म्हणून दिल्या प्रत्येकी 33रुपये व एकुण खर्च 561 रुपये इतका आला.



# १६. सुस्वागतम फलक

कर्मवीर जयंती निमित्त विभाग परिसरात भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांचे व मान्यवरांचे स्वागत करण्यासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी विभागाच्या प्रवेशद्वारावर सुस्वागतम फलक तयार केला . खालील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले.

१.सिद्धार्थ शिंदे

२.रोहित माळी

## ५. सामाजिक कामांचा अहवाल व फोटो

## १.वृक्षारोपण व विभाग परिसर स्वच्छता

समृद्ध व आनंदी जीवनासाठी पर्यावरण रक्षण काळाची गरज आहे त्यामुळे आम्ही वृक्षारोपण हा कार्यक्रम कर्मवीर जयंती निमित्त राबविला. सदर कार्यक्रमासाठी विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते वृक्षारोपणा बरोबर विभाग परिसरातील स्वच्छता आम्ही केली. दररोज झाडांचा पडणारा पालापाचोळा हा आम्ही खत निर्मितीसाठी उपयोगी यावा यासाठी झाडांच्या दरम्यान असणाऱ्या जागेत संचयित केला हा उपक्रम आम्ही वर्षभर राबवीत असतो.



आठवड्यातून किमान एकदा पालापाचोळा गोळा करण्याचे काम विभागातील विद्यार्थी करतात व हा पालापाचोळा पुढे खत म्हणूनच उपयोगी येतो प्रतिवर्षीच्या प्रथेप्रमाणे यावर्षीही वृक्ष लागवड केली.यांचे संगोपन विभागातील विद्यार्थी करतात तसेच सर्वच वृक्षांना पाणीपुरवठा व्हावा या उद्देशाने ठिबक सिंचन सुविधा आम्ही राबवीत असतो त्याची देखभाल ही विद्यार्थी करतात.




## २. सार्वजनिक स्वच्छता-

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. त्यामध्ये भूगोल विभागाच्या माध्यमातून राजेबागेश्वर परिसर स्वच्छता उपक्रम दिनांक २०/०९/२०२४ रोजी राबविण्यात आला. त्या अनुषंगाने आम्हाला आधी दोन दिवस स्वच्छते संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. २०/०९/२०२४ तारखेला आम्ही भूगोल विभागामधून स्वच्छता करण्यासाठी आवश्यक असणारे झाडू घेऊन राजेबागेश्वर परिसरामध्ये चालत गेलो. परिसरामध्ये गेल्यानंतर पहिल्यांदा परिसराची पाहणी करण्यात आली. त्यानुसार विद्यार्थ्यांचे दोन गटात विभागणी करून आसपासच्या परिसरातील प्लास्टिकचे कागद, कपड्यांचे तुकडे, प्लास्टिक बॉटल, पिशव्या, वनस्पतीचे अवशेष, तन सदृश्य वनस्पती इ. साफसफाई करण्यात आली. त्यानंतर परिसरामध्ये असणाऱ्या वृक्षांची माहिती आम्हाला देण्यात आली. उदा. वड, पिपळ, नारळ, शोभेचे रोपे इ. स्वच्छता करून गोळा केलेला कचरा एका ठिकाणी एकत्र करण्यात आला. स्वच्छते संदर्भात सामाजिक जाणीव जागृती करण्यात आली. त्यानंतर थोडा वेळ विश्रांती घेऊन हात व तोंड स्वच्छ धुऊन परत कॉलेजच्या परिसरामध्येया उपक्रमाची माहिती **M.A./M.Sc. I** मधील **विद्यार्थिनी कु. सानिका धनाजी खरात** सांगणार आहे.



